**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com www.attalmat.com RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८५ ■ मंगळवार, दि. २१ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -285 ■ Saturday, 21 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## सैफवर चाकूहल्ला करणारा बांगलादेशी कुस्तीपटू

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर चाकूहल्ला करणारा बांगलादेशचा कुस्तीपटू आहे. त्याने बांगलादेशमध्ये हलक्या वजनाच्या श्रेणीत (लाईट वेट) जिल्हा आणि राष्ट्रीय पातळीवर कुस्तीच्या स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. ही माहिती पोलीस चौकशीतून समजली आहे.

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर १६ जानेवारी रोजी मध्यरात्री चाकूहल्ला झाला. या प्रकरणात मुंबई पोलिसांनी मोहम्मद शरीफुल इस्लाम शेहजाद या ३० वर्षीय तरुणाला अटक केली आहे. न्यायदंडाधिकाऱ्यांनी मोहम्मदला पाच दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली आहे. या कोठडी दरम्यान केलेल्या चौकशीत मोहम्मदकडून मुंबई पोलिसांना नवी माहिती मिळाली आहे.

आर्थिक अडचणी वाढू लागल्यामुळे मोहम्मद नोकरी करत होता. या नोकरी दरम्यान एका रिक्षावाल्याशी गप्पा मारताना मोहम्मदला सेलिब्रेटींच्या घरी दरोडा टाकण्याची कल्पना सुचली. यानंतर मोहम्मदने मुंबईत फिरुन शाहरुख खान, सैफ अली खान यांच्यासह निवडक सेलिब्रेटींच्या घरांची लांबून पाहणी केली होती. कोणत्या घरात कोणत्या मार्गाने प्रवेश करावा याचे नियोजन करण्यासाठी मोहम्मदने वेगवेगळ्या भागांचे फोटो त्याच्या मोबाईलमध्ये काढले होते. ही माहिती मिळताच पोलिसांनी मोहम्मदच्या मोबाईलची तपासणी सुरू केली आहे. गुन्ह्याचे नियोजन, नेमकी घडलेली घटना आणि त्यानंतर ठाण्यात अटक होईपर्यंतचा घटनाक्रम याबाबतची सविस्तर माहिती जाणून घेण्यासाठी मुंबई पोलिसांनी मोहम्मद शरीफुल इस्लाम शेहजाद याची कसून चौकशी सुरू केली आहे.

मोहम्मद भारतात विजय दास (बिजॉय दास) या नावाने वावरत होता. काही दिवस मुंबईत आणि नंतर मुंबई जवळच्या भागात तो वास्तव्यास होता. तो एका हाऊसकिपिंग कंपनीत बनावट कागदपत्रे दाखवून नोकरी करत होता. या नोकरीत असतानाच त्याला गुन्हा करण्याची कल्पना सुचली. सैफच्या घरात दरोडा टाकण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर मोहम्मदने घरातून बाहेर पडून वेगवेगळ्या ठिकाणी फिरत अखेर ठाणे गाठले. या दरम्यान मोहम्मदने वारंवार कपडे बदलले होते. पण पोलिसांनी हाती आलेल्या माहितीच्या मदतीने मोहम्मदला ठाण्याच्या कासारवडवली येथील हिरानंदानी इस्टेटच्या मागे असलेल्या झुडुपातून अटक केली.

## लाडक्या बहीणींसाठी 'महिला व बाल विकास'कडे ३,७०० कोटींचा चेक जमा

### उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली माहिती

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

लाडकी बहीण योजना महायुतीला पुन्हा सत्तेत आणण्यासाठी महत्त्वाची ठरली होती. नोव्हेंबरमध्ये निवडणुकीची प्रक्रिया पार पडल्यानंतर नव्या वर्षाचे हप्ते कधीपासून सुरू होणार, याचीच उत्सुकता योजनेच्या लाभार्थी महिलांना लागली होती. तसेच योजनेबाबत अनेक शंकाकुशंका उपस्थित केल्या जात होत्या. योजनेसाठी निकष लावले जाणार असून अनेक महिला अपात्र ठरू शकतात, अशीही चर्चा मध्यंतरी होती. यावर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

महायुतीचे सरकार आले तर लाडक्या बहिणींना पैसे मिळणार नाहीत, ते योजना बंद करतील, असा आरोप विरोधकांनी आमच्यावर केला. पण माझ्याकडे अर्थ खाते आहे. आम्ही वचनपूर्ती करणारच आहोत. पण योजनेतल्या त्रुटी असतील त्या आम्ही काढू. जी भगिनी खुरपणीला जाते, धुणी-भांडी करते, जी अतिशय गरीब कुटुंबातून आली आहे. जिला १५०० रुपयांचे महत्त्व समजते, तिलाच योजनेचा लाभ दिला जाईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. अजित पवार पुढे म्हणाले, ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांच्या आत आहे. म्हणजे महिन्याला २१ हजारांच्या आत वेतन असलेल्या महिलांनाच आपण ही मदत देणार आहोत. आता मात्र माझ्या लाडक्या बहिणींना आवाहन आहे की, ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांच्या वर आहे, त्यांनी गरीब महिलांकरिता लाडकी बहीण योजनेचा लाभ घेऊ नये. मागे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आवाहन केल्यानंतर अनेकांनी गॅसचे अनुदान सोडले होते. तशाच प्रकारे आताही केले जावे. पण परवाच महिला व बाल विकास खात्याकडे ३,७०० कोटींचा चेक दिला असल्याचेही उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे.

## देवेंद्र फडणवीस लाचार, हतबल मुख्यमंत्री; पालकमंत्रीपदाचा निर्णय बदलताच राऊत यांची टीका

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महायुतीमधील मंत्र्यांचा शपथविधी होऊन एक महिना लोटल्यानंतर नुकतेच जिल्ह्यांचे पालकमंत्री जाहीर करण्यात आले. मात्र अंतर्गत धुसफूस निर्माण झाल्यानंतर नाशिक आणि रायगड जिल्ह्याचा निर्णय रद्द करण्यात आला. यावरून आता महायुतीमधील अंतर्गत कुरघोडी उघड झाली असून विरोधक त्यावर टीका करत आहेत. शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी आज प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्रीपदाचा निर्णय जाहीर केल्यानंतर त्यात बदल केला. एरवी कडक शिस्त, कठोर निर्णय घेणारे मुख्यमंत्री म्हणून प्रतिमा असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना स्वतःचाच निर्णय का बदलावा लागला? पालकमंत्रीपदासाठी इतका हौरटपणा का? पालकमंत्रीपदावरून जी दंगल सुरू आहे, ही त्या त्या जिल्ह्यातील आर्थिक उलाढालीवरून सुरू आहे. आर्थिक कारणांवरून ही मारामारी सुरू आहे, त्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपला निर्णय बदलून ते हतबल, लाचार मुख्यमंत्री असल्याचे दाखवून दिले आहेङ्क, अशी टीका संजय राऊत यांनी केली.

दिल्लीने मुख्यमंत्र्यांच्या निर्णयात हस्तक्षेप केला आहे. हे सरकार दिल्लीतून चालेल, असे आम्ही आधीपासून सांगत आलो आहोत. देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे या कळसुत्री बाहुल्या आहेत आणि त्यांच्या हाता-पायांना बांधलेले दोरे दिल्लीतून नाचवले जातात, हे आज पुन्हा एकदा सिद्ध झालेले आहे. मुख्यमंत्री सरकारचा निर्णय घेऊन राज्यातील गुंडागर्दी, मनमानी मोडण्याचा प्रयत्न करत असताना दिल्ली रस्त्यावर येऊन पालकमंत्रीपदासाठी दंगल करणाऱ्यांच्या बाजूने उभी आहे. पालकमंत्रीपदासाठी दंगल महाराष्ट्राने याआधी पाहिली नव्हती, अशीही टीका संजय राऊत यांनी केली.

धनंजय मुंडेंनी आता अजित पवारांना का थांबवलं नाही

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी २०१९ साली पहाटे झालेला शपथविधी हे एक षडयंत्र असल्याचे म्हटले होते. तसेच धनंजय मुंडे यांनीही त्यावेळी अजित पवारांना थांबविण्याचा प्रयत्न केल्याचे म्हटले. यावर संजय राऊत यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, त्यावेळच्या शपथविधीमध्ये जवळपास सर्वच सामील होते. पण तो गुन्हा फसला. आता त्यावर चर्चा करण्यात अर्थ नाही. मुंडे म्हणत आहेत की, त्यावेळी अजित पवारांना थांबिवण्याचा प्रयत्न केला. मग आता का नाही त्यांना थांबविण्याचा प्रयत्न करत.

## जळगाव हादरलं! सैराटची पुनरावृत्ती!

### लव्ह मॅरेजचा सूड ५ वर्षांनी उगवला; सासरच्या मंडळींनी जावयाला कोयता आणि चॉपरने वार करून संपवले

**जळगाव :** ५ वर्षांपूर्वी केलेल्या प्रेमविवाहाचा राग मनात ठेवून सासरच्या मंडळींनी कोयता आणि चोपरने वार करत जावयाला ठार केल्याची घटना रविवारी जळगाव शहरातील पिंप्राळा हुडको परिसरात घडली आहे. मुलीकडच्यांनी केवळ जावयालाच संपवलं नाही तर वार करताना मध्ये पडलेल्या जावयाच्या कुटुंबातील ७ जणांवरही वार करत जखमी केले आहे.

प्रेम विवाहतून झालेल्या या हत्याकांडानंतर संपूर्ण शहर सुन्न झाले आहे. परिसरात तणाव आहे. घटनेची माहिती मिळताच जळगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पोलिसांनी रामानंदनगर पोलीस ठाण्यात तरुणीच्या भावासह सात जणांविरोधात गुन्हा दाखल केला. यातील ६ जणांना अटक करण्यात आली आहे.

या घटनेत मुकेश रमेश शिरसाठ या प्रेमविवाहित तरुणाची हत्या झाली आहे. या घटनेत जळगावात सैराट चित्रपटाची पुनरावृत्ती झाल्याची चर्चा आहे. या घटनेने परिसरात तणावाचे वातावरण असून परिसरात पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावलाय. घटनेचा तपास सुरू आहे. मुकेश रमेश शिरसाठ याने पाच वर्षांपूर्वी जळगाव शहरातील पिंपराळा हुडको परिसरात पूजा नामक तरुणीशी पळून जाऊन प्रेमविवाह केला. तेव्हापासून शिरसाट कुटुंबीय आणि तरुणीच्या माहेरील मंडळींमध्ये वाद सुरू होते. रविवारी सकाळी मुकेश दुकानावर जाण्यासाठी घराबाहेर आला. त्यावेळी मुलीच्या माहेरच्या मंडळींनी कोयता आणि चोपरने मुकेशच्या मानेवर वार केला. यात गंभीर दुखापत झाल्याने मुकेशचा जागीच मृत्यू झाला. मुकेशवर वार होत असताना त्याला वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या मुकेशचा भाऊ, काका, काकू, दोन चुलत भाऊ, चुलत बहीण यांच्यावरही मुलीच्या माहेरच्यांनी वार केले असून यात कुटुंबातील ७ जण जखमी झाले आहेत. मुकेशच्या पश्चात आई-वडील भाऊ पत्नी व मुलगी आहे.

**माझ्या लेकराला मारलं, त्यांना फाशीचीच शिक्षा व्हावी; मुकेशच्या आईने फोडला टाहो!**

आपल्या मुलाच्या हत्येनंतर मुकेशच्या आईने टाहो फोडत पोलिसांवर गंभीर आरोप केला आहे. माझ्या लेकराला मारलं, त्यांना फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे. मी धुणं भांड्याचे काम करते. माझा नवरा हमाली करतो, मी कस काय दोन लेकरांना सांभाळू. आता मी त्यांना कसे वाढवू. आम्हाला न्याय पाहिजे. प्रेम विवाह केला म्हणूनच त्यांनी हत्या केली. चार वर्षांपासून ते आम्हाला त्रास देत होते, शेवटी त्याला मारून टाकले असे म्हणत त्यांनी टाहो फोडला. तसेच, आम्ही पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दिली होती. पण पोलिसांनी दखल घेतली नाही.

पोलिसांकडून त्यांच्याकडून पैसे खाल्ले, असा आरोप देखील त्यांनी केला आहे. दरम्यान, मुकेश शिरसाठच्या हत्येनंतर त्याची पत्नीने देखील प्रतिक्रिया दिली आहे. पूजा शिरसाठ म्हणाल्या की, आपण प्रेम विवाह केल्याने आपल्या परिवारातील लोकांनी माझ्या पतीची हत्या केली आहे. पतीच्या हत्येने माझे आणि म झ्या लहान मुलींचे भविष्य अंधकारमय झाले आहे. माझ्या पतीची हत्या करणायांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## राज्यात येत्या २४ तासात हवामान बदलाची शक्यता!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गेले काही दिवस राज्यात थंडावा असलातरी हवामानाचा लपंडाव सुरूच आहे. पहाटे गारवा आणि दिवसभर उकाडा या हवामानाच्या बदलामुळे नागरिकही चिंतेत आहेत. राज्याच्या तापमानात हलका बदल होत असून श्रिलंका आणि तमिळनाडू समुद्रात चक्राकार वाऱ्यांचा प्रभाव आहे. यामुळे दक्षिणेकडील राज्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. सर्वत्र ढगाळ वातावरण निर्माण होत आहे. दरम्यान,हवामान विभागाने आता महाराष्ट्रात तापमान वाढणार असल्याचं सांगितल आहे.

हवामान विभागाकडुन मिळालेल्या माहितीनुसार सध्या चक्राकार वारे राजस्थान आणि परिसरात सक्रीय आहेत. दक्षिणेकडील राज्यात सध्या तुफान पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. तर उत्तरेकडील राज्यांमध्ये प्रचंड थंडी आहे. याचा परिणाम राज्याच्या तापमानावर होत असून गेल्या काही दिवसात होणारा तापमानातल्या बदलामागे हे कारण आहे.

राज्यात येत्या २४ तासांत पुढील तीन दिवसांसाठी तापमानात बदल होणार असल्याचं हवामान विभागानं सांगितल आहे. महाराष्ट्रात येत्या ३ दिवसात किमान तापमानात वाढ होणार असून २ ते ३ अंशांनी राज्यात बहुतांश ठिकाणी तापम ान वाढेल. त्यानंतर पुढील दोन दिवस तापमानात फारसा बदल होणार नाही. गेल्या दोन दिवसांपासून राज्यात बहुतांश ठिकाणी तापमानाचा पारा उतरलेला होता. अनेक भागात तापमान १० अंशांच्या खाली नोंदवले जात होते.

## डॉक्टरांच्या आश्वासक हमीमुळेच रूग्णांचा ५० टक्के आजार बरा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अनेकदा डॉक्टरांच्या आश्वासक हमीमुळेच रूग्णांचा ५० टक्के आजार बरा होतो. त्यामुळे मानवतेसाठी सुरू असणारे अविरत कार्य हे समाजातील शेवटच्या घटकाचा लाभ होईल या उद्देशाने केईएम रूग्णालयाच्या माध्यमातून अखंडितपणे व्हावे, अशी सदिच्छा बॉलिवूड अभिनेते अमिताभ बच्चन (आळींरलह इरललहरप) यांनी व्यक्त केली.

मुंबई महानगरपालिका संचालित 'सेठ गोर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व राजे एडवर्ड स्मारक रूग्णालय केईएम रुग्णालयाच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त सोमवारी (२०) आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

एखाद्या संस्थेच्या इतिहासात १०० वर्षांचा कालावधी हा अतिशय मोठा कालावधी असतो. वेगाने बदलर्णाया जगतामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील सेवा-सुविधाही अतिशय वेगाने बदलत आहेत. जनसेवेचे व्रत घेतलेल्या केईएम संस्थेच्या यशामध्ये आणखी १०० वर्षांची भर पडावी, अशा शुभेच्छा बॉलिवूड अभिनेते अमिताभ बच्चन यांनी याप्रसंगी दिल्या.

याप्रसंगी मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी अमिताभ बच्चन यांचा सत्कार केला. कार्यक्रमासाठी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ विपिन शर्मा, केईएम रूग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत, निष्णात शल्यचिकित्सक डॉ. जयंत बर्वे, आदी मान्यवर उपस्थित होते.

पोलिओ सारख्या आजाराला राष्ट्रीय पातळीवर हटवण्याच्या मोहिमेत आपण सर्व समाजाने एकत्र येऊन यश मिळविले. नॉन-अल्कोहोलिक स्टीटोहेपेटायटिस आजारालाही हटवण्यासाठी संकल्प करूयात. या मोहिमेसाठी वैद्यकीय क्षेत्रासोबत सदिच्छादूत म्हणून कार्यरत राहणार असल्याची ग्वाही बॉलिवूड अभिनेते अमिताभ बच्चन यांनी सोमवारी २० जानेवारी २०२५) केईएम रुग्णालयाच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त दिली. याप्रसंगी नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज (छअऋङऊ) आजाराबाबतच्या माहिती पुस्तिकेचे अनावरणही याप्रसंगी करण्यात आले. तसेच केईएम रूग्णालयाच्या शतक महोत्सवी वर्षांनिमित्त विशेष पुस्तिकेचे प्रकाशन याप्रसंगी करण्यात आले.

योग्य उपचार मिळाल्याने आयुष्यमान वाढले! - कोणत्याही आजाराकडे दुर्लक्ष करू नका. वेळीच योग्य वैद्यकीय सल्ला हा कोणत्याही आजारावर उपचारासाठी महत्वाचा ठरतो. अद्ययावत तंत्रज्ञानाचा वैद्यकीय क्षेत्रात अतिशय वेगाने वापर होतो आहे. त्यामुळे गेल्या अनेक दशकातील वैद्यकीय शल्यचिकित्सा क्षेत्रात झालेल्या बदलांबाबतही त्यांनी याप्रसंगी भाष्य केले. गेल्या अनेक वर्षात सातत्याने वैद्यकीय क्षेत्राने आपल्याला कशा पद्धतीने जीवनदान दिले याबाबतच्या आठवणीही त्यांनी याप्रसंगी जागृत केल्या. कूली चित्रपटाच्या निमित्ताने अपघातात मिळालेले उपचार, टीबी आजाराच्या निमित्ताने मिळालेले उपचार, यकृताचा आजार याप्रसंगी योग्य उपचार मिळाल्याने आयुष्यमान वाढल्याचे श्रेय त्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाला दिले. आगामी काळातही जनसेवेचा वारसा केईएम रूग्णालयात शिक्षण घेणाऱ्या नव्या उमेदीच्या डॉक्टरांनी कायम ठेवावा, अशी अपेक्षाही बच्चन यांनी याप्रसंगी व्यक्त केली. कोव्हिडच्या कालावधीत डॉक्टरांनी रूग्णसेवेसाठी केलेल्या कार्याचे कौतुकही अमिताभ बच्चन यांनी याप्रसंगी केले. नॉन अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसिज या आजाराबाबत जनजागृती - शतक महोत्सवी कार्यक्रमांमध्ये ख्यातनाम अभिनेते अमिताभ बच्चन यांना सन्माननीय अतिथी म्हणून सोमवारी २० जानेवारी २०२५ रोजी निमंत्रित करण्यात आले होते. अमिताभ बच्चन हे प्रामुख्याने नॉन अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसिज या आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी सदिच्छादूत (ब्रॅण्ड एम्बेसेडर) म्हणून कार्यरत राहण्याबाबत यावेळी घोषणा केली.

प्रत्येक शुक्रवारी ओपीडी - नॉन-अल्कोहोलिक सोरायसिस या आजारामध्ये फॅटी लिव्हरमुळे रूग्णाला सोरायसिस होऊ शकतो. आधुनिक जीवनशैलीमुळे तरूणाईत वाढणाऱ्या या आजारासाठी मुंबईत पहिल्या बाह्य रूग्ण विभागाची सुरूवात केईएम रूग्णालयात करण्यात आली. प्रत्येक शुक्रवारी दुपारी दीड वाजता ही ओपीडी कार्यरत असणार आहे. नॉन-अल्कोहोलिक स्टीटोहेपेटायटिस (नॅश - छअडक) हा नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज (छअऋङऊ) चा एक प्रकार आहे. यकृताच्या या आजाराचे निदान करुन उपचार घेणे गरजेचे आहे. याकरिता या आजारांवरील उपचारासाठी केईएम रुग्णालयामध्ये स्वतंत्र ओपीडी स्थापन केली जाणार आहे.

## सत्तेसाठी महिलांना साकडे

म्हाला सत्ता दिली तर आम्ही आपल्यासाठी सरकारचा खजिना खुला करू अशा प्रकारचे आश्वासन राजकीय पक्षांनी दिल्लीची निवडणूक जिंकण्यासाठी महिलांना दिले आहे. अशात, दिल्लीतील महिला सत्तेची चावी कुणाच्या हाती देतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहणार आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता रंगात आला आहे. ७० सदस्यांच्या विधानसभेत आपला नंबर लागावा यासाठी ९८१ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सत्ताधारी आम आदमी पक्ष आणि काँग्रेसचा जाहीरनामा जाहीर झाला आहे. भाजपचा जाहीरनामा तीन टप्प्यात असून त्यातील पहिला टप्पा जाहीर केला आहे. दिल्लीतील राजकीय वातावरण आणि जाहीरनामा बघितल्यानंतर एक गोष्ट नक्की झाली आहे ती अशी की, सत्ता हवी असेल तर महिला मतदारांना खूश करणे आवश्यक आहे, यावर सर्वपक्षांमध्ये एकमत झालेले आहे. म्हणून सर्वच पक्षांनी महिलांना कन्व्हेंस करण्याचा प्रयत्न केला आहे. मागील एका दशकात झालेल्या निवडणुकांचा इतिहास बघितला तर याची जाणीव प्रकर्षाने होईल की, देशाची अथवा राज्याची सत्ता मिळविण्यासाठी सर्व राजकीय पक्ष 'स्त्रीशक्ती'ची उपासणा करीत आहेत. थोडक्यात, स्त्री ही सत्तादायिनी आहे, यावर नेते मंडळींचा विश्वास बसला आहे. या देशातील महिला सत्ता प्रदान करणारी आहे, याची सर्वप्रथम जाणीव झाली ती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने 'ट्रीपल तलाक' कायदा केल्यानंतर. २०१९ मधील भाजपच्या विजयात या कायद्याने मोलाची भूमिका बजावली होती. महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे पारित झालेले विधेयक. लाडली बहन आणि लाडकी बहीण या योजनेने भाजपला मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राची सत्ता मिळवून दिली. काँग्रेसला कर्नाटकची आणि झारखंड मुक्ती मोर्चाला झारखंडची सत्ता मिळाली ती महिलांनी तथास्तू म्हटल्यामुळेच. आता दिल्लीत विधानसभेची निवडणूक होत आहे. सत्ताधारी आम आदमी पक्ष, दिल्लीत २७ वर्षांपासून वनवास भोगत असलेला भारतीय जनता पक्ष आणि अलीकडच्या बहुतांश निवडणुकांमध्ये पराभवाचे तोंड बघावे लागत असलेल्या काँग्रेसने दिल्लीची निवडणूक जिंकण्यासाठी स्त्री शक्तीलाच साकडे घातले असल्याचे दिसून येत आहे. दिल्लीची सत्ता आम्हाला दिली तर सरकारची तिजोरी तुमच्यासाठी खुली करू, अशाप्रकारचे आवाहन आप, भाजप आणि काँग्रेससह जवळपास सर्वच पक्षांनी केले आहे. भाजप यात अग्रभागी आहे. भाजपने महिलांना दरमहा २५००, गर्भवती महिलांना एकरकमी २१ हजार आणि सहा पोषण किट, दिवाळी आणि होळीमध्ये एक-एक सिलेंडर फ्री, विधवा महिलांना ३००० पेंशन देण्याचे आश्वासन दिले आहे. याशिवाय, ७० वर्षांपुढील नागरिकांना १० लाखांचा विमा, ३००० रूपये पेंशन आणि ६०-७० वयोगटातील लोकांना २५०० पेंशन अशाप्रकारचे आश्वासन दिले आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने आता महिलांना दरमहा २१०० रूपये देण्याची घोषणा केली आहे. महिलांना आधीपासूनच बसचा प्रवास फ्री आहे. २० हजार लीटर पाणी आणि २०० युनिटपर्यंत वीज मोफत आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी संजीवनी योजना सुरू आहे. तर, ६० वर्षांपुढील नागरिकांना सरकारी आणि खासगी रूग्णालयाल मोफत उपचार, ज्येष्ठांसाठी स्वतंत्र पेंशन योजना देण्याचे आश्वासन दिले आहे. काँग्रेसने महिलांना दरमहा २५०० देण्याचे आश्वासन दिले आहे. याशिवाय, दिल्लीवासियांना २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा, पाचशे रूपयात सिलेंडर, बेरोजगार तरूणांना दरमहा ८५०० मानधन, ३०० युनिट वीज मोफत देण्याचे आश्वासन दिले आहे.
विशेष सांगायचे म्हणजे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळविण्यासाठी आतूर आहे. म्हणूनच रालोआचा घटक पक्ष असूनही राकाँने बंडाचे निशाण फडकवित दिल्लीच्या निवडणुकीत ३० उमेदवार उतरविले आहेत. यात एक महिला आणि १४ मुस्लीम उमेदवार आहेत. मुळात, रालोआने दिल्लीची निवडणूक एकजुटीने लढावी अशी भाजपची इच्छा होती. यासाठी भाजपने शिवसेना, राकाँ, जेडीयू आणि लोजपा या चारही पक्षांना एक-एक जागा देण्याची तयारी दर्शविली होती. मुळात, भाजप पाच जागा सोडायला तयार होता. पाचवी जागा जीतनराम माँझी यांच्या पक्षाला सोडली जाणार होती. परंतु, आपल्याकडे उमेदवार नाही असे सांगून त्यांनी निवडणूक न लढण्याचा निर्णय भाजपला कळविला. शिवसेनेने दिल्लीच्या निवडणुकीतून माघार घेण्यामागे कारण आहे. महाराष्ट्रात मुंबई महानगरपालिकेची निवडणूक होणे आहे. भाजप आणि शिवसेना मिळून निवडणूक लढणार आहे. अशात, भाजपशी मोलभाव करताना जास्तीत जास्त जागा मिळविता याव्या यासाठी सेनेचा वाघ एक पाउल मागे झाला. इकडे, शिवसेनेच्या दिल्ली युनिटला

शिवसेना मागील अनेक वर्षांपासून दिल्लीची लढण्याची तयारी करा असा संदेश मिळाल्यामुळे इकडे तयारी सुरू होती. शिवसेनेच्या दिल्ली युनिटने निवडणूक लढण्याची पूर्ण तयारी केली होती. बारा उमेदवारांची यादी तयार होती. शिंदेसेनेचे सचिव संजय मोरे मागील दोन-तीन दिवसांपासून उमेदवार फायनल करण्याकरिता दिल्लीत होते. मात्र, गुरूवारी सायंकाळी सहाच्या सुमारास मोरे यांना मुंबईहून एक फोन आला आणि शिवसेना दिल्लीत लढणार नसल्याचे मोरे यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले. निवडणूक लढत आहे. २०२० मध्ये बुराडी, चांदणी चौक, करोलबाग, मालवीय नगर आणि विकासपुरी या पाच लढविल्या होत्या. बुराडीमध्ये १८०४४ मते मिळवित सेना तिसऱ्या स्थानी होती. मात्र, उर्वरित उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली होती. शिवसेनेतील बंडखोरीनंतर मुख्यमंत्री झालेले एकनाथ शिंदे यांनी २१ सप्टेंबर २०२२ रोजी नवीन महाराष्ट्र सदनात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला होता. यास उत्तर भारतातील राज्यांचे प्रमुख आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# ब्रिटिश इंडिया संबोधीः फ्रंटियर गांधी

## (खान अब्दुल गफारखान स्मृतिदिन विशेष)

**मघेतलेल्या शिष्यत्वाच्या परीक्षेत आबाजी उत्तीर्ण झाले. म्हणून गुरू माणिकबाबांनी त्यांना अनुग्रह दिला आणि गुरूपदेश केला. नंतर गुरूंनी त्यांचे नाव भगवान ठेवले. त्यांचे पुण्यस्मरण करून श्रीकृष्णदास निरंकारी- बापू यांनी लेखरूपाने लिहिलेली ही रोचक माहिती... संपादक**

अब्दुल गफ्फार खान हे एक राजनैतिक आणि आध्यात्मिक नेता होते. त्यांना महात्मा गांधीसारखे अहिंसा आंदोलनासाठी ओळखले जात होते. ते गांधीजींचे समर्थक होते. ब्रिटिश इंडियामध्ये त्यांना फ्रंटियर गांधी या नावाने संबोधले जायचे. खुदाई खिदमतगारच्या यशामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्या व समर्थकांविरुद्ध कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील काही जण या दडपशाहीस बळी पडले. बच्चा खानने अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या भारत फाळणीच्या मागणीचा जोरदार विरोध केला. जेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने विभागीय योजनेची स्वीकृती जाहीर केली तेव्हा विभाजनानंतर त्यांनी पाकिस्तान सोबत राहण्याचा निर्णय घेतला.

खान अब्दुल गफारखान यांचा जन्म दि.६ फेब्रुवारी १८९०मध्ये ब्रिटिश इंडिया पेशावर, पाकिस्तान येथील उत्मानजई येथे झाला. त्यांचे वडील बहराम हे तेथील जमीनदार होते. स्थानीय पठाण लोकांचा विरोध असताना त्यांच्या वडिलांनी त्यांना व त्यांच्या भावाला मिशन स्कूलमध्ये शिकवले. त्यानंतर त्यांनी त्यांचे शिक्षण अलीगढ मुस्लिम महाविद्यालयात पूर्ण केले. सन १९१०मध्ये त्यांनी आपल्या गावामध्ये एक शाळा उघडली. त्यानंतर ते स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी झाले. सन १९१५साली ब्रिटिशांनी त्यांच्या शाळेवर बंदी घातली. सरहद्द गांधी यांना स्वतंत्र आणि धर्मनिरपेक्ष असा भारत देश पाहिजे होता. हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी त्यांनी सन १९२९ मध्ये खुदाई खिदमतगार नावाची संघटना उभारली होती. ही संघटना सुर्ख पोश तसेच लाल डगेलवाले या नावाने देखील ओळखली जात होती. या संघटनेची स्थापना म.गांधीजींच्या अहिंसा आणि सत्याग्रह यांसारख्या सिद्धांताने प्रेरित होऊन केली होती. या संघटनेमध्ये साधारणतः एक लक्ष सदस्य सामील झाले. त्यांनी शांततापूर्वक इंग्रज पुलिसांचा विरोध केला. खान अब्दुल गफारखान हे म.गांधींचे एकनिष्ठ अनुयायी व पख्तुनांच्या स्वातंत्र्यलढ्यातील अग्रगण्य नेते होते. त्यांचा जन्म पेशावरजवळील उत्मानझाई या खेड्यात एका श्रीमंत घराण्यात झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पेशावर येथे झाले. त्यांनी लष्करात गाइड्स या तुकडीत नोकरी धरली. गोऱ्या अधिकाऱ्यांकडून हिंदी लष्करी अधिकाऱ्यांना अपमानास्पद वागणूक मिळत होती. म्हणून लष्करी नोकरीचा त्याग करून ते अलीगढ विद्यापीठात शिक्षणासाठी गेले. सन १९१०पासून आपल्या प्रदेशात राष्ट्रीय शाळा काढून पठाण बांधवांत जागृती व देशप्रेम निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला.

रौलट ॲक्टसारख्या जुलमी कायद्याविरूद्ध महात्मा गांधीनी सुरू केलेल्या आंदोलनात गफारखानांनी सक्रिय भाग घेऊन वायव्य सरहद्द प्रांतात चैतन्य निर्माण केले. सन १९२०च्या नागपूर काँग्रेस अधिवेशनात त्यांनी भाग घेतला तसेच आपल्या प्रांतात खिलाफत चळवळ संघटित केली.

सन १९२४मध्ये तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी सामाजिक सुधारणांचे कार्य हाती घेतले. सन १९२९मध्ये म.गांधी, नेहरू, मौलाना आझाद आदी भारतीय पुढाऱ्यांशी त्यांचा परिचय होऊन काँग्रेस चळवळीत ते सामील झाले. याच कार्यास मदत व्हावी, म्हणून खुदाई खिदमतगार ही स्वयंसेवक संघटना त्यांनी स्थापन केली. पठाण जमातीत सत्य, अहिंसा, शिस्त व राष्ट्रप्रेम निर्माण करणे, हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता. ब्रिटीश सरकारचा रोष होऊन ही संघटना बेकायदेशीर ठरविण्यात आली. नंतरच्या सत्याग्रहात त्यांना पुन्हा कारावास भोगावा लागला.

काँग्रेसचे अध्यक्ष पद गफारखानांना दोनदा देऊ केले असता आपण केवळ एक सेवक आहोत, असे म्हणून त्यांनी ते नाकारले. एवढेच नव्हे तर प्रांतीय अगर अखिल भारतीय निवडणुकीस उभे राहण्याचेही त्यांनी कधीच मान्य केले नाही. अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीचे ते सन १९४७च्या फाळणीपर्यंत सदस्य होते. सन १९२०-४७पर्यंत त्यांनी एकंदर चौदा वर्षांचा तुरुंगवास भोगला. विभाजनानंतर बच्चा खान यांनी पाकिस्तानशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली, पण सन १९४८-५४च्या दरम्यान पाकिस्तानी सरकारने त्यांना वारंवार अटक केली. सन १९६९मध्ये पुन्हा युनिट कार्यक्रमाच्या विरोधात त्यांना पुन्हा अटक करण्यात आली.


- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

दुसऱ्या महायुद्धानंतर भारतीय स्वातंत्र्यासाठी झालेल्या वाटाघाटीत भारताचे विभाजन होण्याची चिन्हे दिसताच त्याला गफारखानांनी तीव्र विरोध तर केलाच, परंतु विभाजन झालेच तर वायव्य सरहद्दीवरील पठाणांचा स्वायत्त पख्तुनिस्तान झाला पाहिजे, असाही त्यांनी आग्रह धरला. परंतु त्यांचा प्रयत्न निष्फळ ठरला आणि सरहद्द प्रांत पाकिस्तानचाच एक भाग झाला.

भारतीय पुढाऱ्यांनी आम्हाला लांडग्यांच्या ताब्यात देऊन स्वतःला स्वातंत्र्य मिळविले, असे दुःखपूर्ण उद्गार त्यांनी त्यावेळी काढले होते. म.गांधींच्या आदेशानुसार ते आपल्या प्रांतात गेले. पाकिस्तानशी एकनिष्ठ राहण्याची त्यांनी शपथही घेतली. पण आपल्या प्रदेशासाठी स्वायत्तता मिळाली पाहिजे, असा आग्रहही त्यांनी धरला. त्यामुळे त्यांना तुरुंगात टाकण्यात येऊन त्यांची खुदाई खिदमतगार संघटना बंद करण्यात आली. पाकिस्तान स्वतंत्र झाल्यापासून सन१९६४पर्यंत जवळजवळ ते पाकिस्तानी तुरुंगातच राहिले.

प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे सप्टेंबर १९६४मध्ये गफारखानांना इंग्लंड येथे जाण्याची पाकिस्तान सरकारने परवानगी दिली. पाकिस्तानात परत येणे धोक्याचे आहे, हे जाणून ते डिसेंबरमध्ये अफगाणिस्तानात गेले. गांधी जन्मशताब्दी महोत्सवात भाग घेण्यासाठी गफारखान भारत सरकारच्या निमंत्रणानुसार ऑक्टोबर १९६९मध्ये भारतात आले. येथील मुक्कामात त्यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी योजण्यात आलेले नेहरू पारितोषिक देण्यात आले. भारतासाठी केलेल्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भारतीयांनी त्यांना थैली अर्पण केली. सरहद्द प्रांतातील म.गांधींसारखी महान व्यक्ती म्हणून त्यांना सरहद्द गांधी असे गौरवाने संबोधिले जाते. त्यांचा मृत्यू दि.२० जानेवारी १९८८ रोजी पेशावर येथे झाला.

!! सरहद्द गांधींच्या पावन स्मृतींना विनम्र अभिवादन !!

# महिलांच्या आरोग्याच्या समस्यांचा उलगडा

**महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी सुलभतर्फे नुकताच भारतातील मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन व्यापक अहवाल प्रकाशित करण्यात आला. यात मासिक पाळी येण्यापासून मासिक पाळी जाईपर्यंत मूल होणे किंवा न होणे यासारख्या मुद्द्यांपर्यंत अनेकवेळा स्त्रीला दुजाभाव सहन करावा लागतो आणि म्हणूनच आरोग्य आणि महिलांचा जवळचा संबंध आहे हे सिद्ध करणारा हा संशोधन अभ्यास भारतातील १४ जिल्ह्यांमधील २० ते ४९ वयोगटातील मासिक पाळी येणाऱ्या महिलांच्या माहितीवर आधारित आहे.**

शोधकांनी प्रामुख्याने मध्यमवर्गीय महिलांच्या मासिक पाळी संबंधी समस्यांवर लक्ष केंद्रित केले तसेच तरुण महिलांच्या समस्यांवरील यात समावेश केला गेला. या संशोधन अहवालात मासिक पाळीसंबंधी समस्यांमुळे महिलांना येणाऱ्या अडचणींचा उलगडा केला गेला. मासिक पाळी दरम्यान कामासाठी स्थलांतर करणाऱ्या महिलांना जसे की उसाच्या शेतामध्ये, वीटभट्ट्यांमध्ये खाणींमध्ये आणि कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या महिलांना सामोरे जावे लागणाऱ्या आव्हानांना अधोरेखित करण्यात आले. महिलांच्या आरोग्यावर परिणाम करणारे समस्यांचा बहुपक्षिय स्वरूपाचा उलगडा या अहवालात करण्यात आला आहे. यामध्ये मासिक पाळीसाठी लागणाऱ्या स्वच्छता उत्पादनांची माफक दरात उपलब्धता पाणी स्वच्छता संबंधित पायाभूत सुविधांचा अभाव यांचा समावेश होता.

सार्वजनिक योजनांची वितरण व्यवस्था मासिक पाळी बद्दलच्या सामाजिक विरोधी चुकीच्या समजूती आणि आरोग्य शिक्षणाची गरज यावर देखील यावर प्रकाश टाकण्यात आला. त्याचबरोबर महिलांचे आरोग्यावर परिणाम करणारे इतर विविध घटक प्रामुख्याने नमूद होते. या अहवालाचा उद्देश पुराव्यावर आधारित माहितीचा वापर करून विद्यमान धोरणे अधिक सक्षम करणे किंवा नवीन धोरणांसाठी मार्गदर्शन करणे हा होता. राज्यातील बीड आणि धाराशिव जिल्हा प्रामुख्याने स्थलांतरितांचा व दुष्काळी प्रदेश मानला जातो या जिल्ह्यांमधील मुलाखतींवर आधारित महाराष्ट्र विषय एका भागात महिलांमधील जैविक जागृतीचा अभाव मासिक पाळी संबंधी आरोग्य धोक्यांबाबत अज्ञान तसेच सामाजिक रूढी आणि गैरसमजांमुळे मासिक पाळीच्या स्वच्छतेविषयी चर्चा करण्यास महिलांना येणारे अडथळे अधोरेखित करण्यात आले आहे. स्थलांतरित महिला कामगारांमध्ये गर्भाशय काढून टाकण्याच्या समस्यांवरील विस्तृत चर्चा करण्यात आली आहे. या अहवालानुसार मासिक पाळी दरम्यान शाळेतील शौचालयांच्या निकृष्ट सुविधांमुळे मुलींना त्याचा वापर करण्याची भीती वाटते त्यामुळे मासिक पाळी दरम्यान शाळेत मुलींची गैरहजेरी वाढते.

बीडमधील सर्वेक्षण केलेल्या १९.१% महिलांना मासिक पाळीशी कोणते अवयव संबंधित आहेत हे माहीतच नव्हते तर २६.५ महिलांना मासिक पाळीची कारणे माहीत नव्हती तर २४.५% महिला आणि धाराशिवमधील १६.८% महिला मासिक पाळीच्या त्याच्या दुष्परिणाम काय आहेत ते सांगू शकले नाहीत मासिक पाळीच्या स्वच्छतेच्या पद्धती बीड मधील ७०.३% आणि धाराशिवमधील ६६.२% महिला कापड व्यतिरिक्त मासिक पाळीच्या उत्पादनांचा वापर करतात ६५.२% महिलांनी खर्च वाचवण्यासाठी कापडासोबत सॅनिटरी पॅड वापरले ते सांगितले. बीडमध्ये मासिक पाळीच्या उत्पादनांवर सरासरी खर्च करण्याची क्षमता धर्मा २७ रुपये होती आणि धाराशिवमध्ये ५७ रुपये होती दोन्ही जिल्ह्यांमध्ये जवळजवळ अर्ध्या महिलांनी मासिक पाळीच्या वेळी स्वच्छ सुती कापड वापरण्याचे सांगितले. त्यापैकी ६२.२% महिलांनी कापड पुन्हा वापरल्याचे सांगितले हे कापड बाथरूममध्ये किंवा विहिरी किंवा पंपाजवळ धुतले जाते. दोन्ही जिल्ह्यांमध्ये ४७% महिलांनी एकत्रितपणे प्रत्येकवेळी साबण वापरला, तर ५०% महिलांनी साबणाचा विसंगत वापर केला. ८३.७ महिलांनी मासिक पाळीचे कपडे लपलेल्या ठिकाणी वाळवले.फक्त अर्ध्या महिलांनी वापरण्यापूर्वी कापड पूर्णपणे कोरडे असल्याची खात्री केली. ९१.७% मध्यमवर्गीय महिलांनी सांगितले की, महिला डॉक्टरांच्या अभावामुळे त्यांनी मासिक पाळीशी संबंधित आरोग्य समस्यांसाठी वैद्यकीय सल्ला घेण्याचे टाळले. मासिक पाळीच्या आरोग्याच्या गंभीर समस्या असूनही बीडमधील फक्त १४.३% महिलांना वैद्यकीय सल्ला घेतल्याचे सांगितले. प्रत्यक्षात फक्त ७.१ महिलांनी डॉक्टरांना भेट दिली आणि उपचार घेतले. धाराशिवमधील ७०.४ महिलांनी डॉक्टर खूप दूर असल्याचे कारण सांगितले. जिल्ह्यातील १४.८ महिलांनी सांगितले की त्यांच्याकडे डॉक्टरकडे जाण्यासाठी पैसे नाहीत. महिला डॉक्टर नसल्यामुळे दोन्ही जिल्ह्यांमध्ये ४४.९ महिलांनी मासिक पाळीच्या आरोग्याच्या समस्यांबाबत वैद्यकीय सल्ला घेण्याचे टाळले ५७७ पैकी ६६ महिलांनी गर्भाशय काढण्याचे ऑपरेशन केल्याचे सांगितले. ६६ पैकी फक्त चार गर्भाशय शस्त्रक्रिया सरकारी रुग्णालयांमध्ये करण्यात आल्या. गर्भाशय काढण्याचे ऑपरेशन झालेल्या तीन महिलांनी सांगितले की कमी सहनशक्ती आणि पुरेशा स्वच्छता सुविधेच्या अभावामुळे घराबाहेर काम करताना अडथळा ठरते. या अहवालातील विशेष नमूद केलेल्या गोष्टी म्हणजे महाराष्ट्रातील ५७७ पैकी ३७३ महिला या कच्च्या घरात राहतात. बीडमधील ३५१ पैकी ७३ महिला या पक्क्या घरात राहतात. धाराशिवमध्ये २२६ पैकी फक्त सहाजणांना पक्की घर परवडतात आणि पक्क्या घरांमध्ये शौचालय बांधता येतात. कच्च्या घरांमध्ये शौचालय बांधता येत नाही. ५७७ पैकी ५२९ महिलांनी पाईपलाईन हा त्यांचा प्राथमिक पाण्याचा स्त्रोत असल्याचे सांगितले तसेच बीड आणि धाराशिवमध्ये अनेकदा दुष्काळांची दुष्काळासारख्या परिस्थिती आणि तीव्र पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे गावांना टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जाते अशा परिस्थितीत महिलांना मासिक पाळीच्या स्वच्छतेसाठी अतिरिक्त अडचणींना तोंड द्यावे लागते. ५७७ महिलांनी फक्त २८६ जणांनी सातवीपर्यंत शाळा शिकली होती. बहुतेकदा मासिक पाळीच्या वेळी किंवा त्यापूर्वी शाळा सोडली जाते. हा फक्त दोन जिल्ह्यांपुरता विचार झाला. अशी असंख्य धक्कादायक निष्कर्ष या अहवालात आहेत. आपण आपला महाराष्ट्र कितीही प्रगत मानला तरी ग्रामीण भागातील अवस्था अत्यंत बिकट आहे. ग्रामीण भागातील काही भयानक रूढी त्यात महिलांच्या शिक्षणाबाबत होणारे दुर्लक्ष. महिलांना आजही उपभोग्य समजले जाणारे विचार त्यामुळे संपूर्ण समाजाचा महिलेकडे बघण्याचा दृष्टिकोन यामुळे महिलांच्या प्रगतीकडे हवे तितके लक्ष दिले जात नाही. अजूनही ग्रामीण भागातील विभागांकडे सरकारी यंत्रणा पोहोचवून महिलांना साक्षर करून प्रगत करणे खूप आवश्यक बनले आहे. या अहवालात त्या त्रुटींबाबत व उपाय सुचवण्यात आले आहेत. त्याचा चांगला वापर करून सरकारने या अहवालावर अभ्यास करून त्वरित कार्यवाही करणे महिलांच्या आरोग्यबाबतीत तसेच येणाऱ्या पिढीसाठी आवश्यक ठरणार आहे.

**- अल्पेश म्हात्रे**

## कुणाच्या हत्येचा राजकीय हत्यार म्हणून वापर होऊ नये - पंकजा मुंडे

**नागपूर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

माझा बीड जिल्हा मुळात चांगला आहे. कुणाची हत्या हे राजकारणाचे हत्यार होऊ शकत नाही, हा कलंक आहे. तो पुसण्यासाठी सगळ्यांनी प्रयत्न केला पाहिजे. मुळात बीड शांत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनादेखील त्याचा अनुभव येईल, असा दावा पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी विमानतळावर माध्यमांशी बोलताना केला.

आज आपल्या खात्याशी संबंधित विविध कार्यक्रम आटोपल्यानंतर माहूरला श्री रेणुकामातेचे दर्शन घ्यायला जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मत्स्य महाविद्यालय येथील अनेक गोष्टी समजून घेतल्या. सहयोगी मंत्री नीतेश राणे यांच्याशीही चर्चा करणार असून जास्तीत जास्त संसाधन वाढवणे, यावर आमचा भर असणार आहे. नव्या इमारतीची आवश्यकता आहे. एकंदरीत हा दौरा उपयुक्त ठरणार आहे. शेतकऱ्यांना उद्योजक बनवण्यासाठी शेतीवर आधारित उद्योग कसे वाढवता येईल, यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. सगळ्या गोष्टींचा अभ्यास करत आहे.

महाराष्ट्र पुढे जावा हीच संकल्पना आहे. सबसिडी, कर्ज, मार्केटिंग ट्रेनिंग यावर विचार करतो आहोत.

पोल्ट्री, वराहपालन वेगवेगळे विषय आहेत. शेवटी जे माणसांसाठी चॅलेंज आहे, ते पशूंसाठीही आहे. बर्ड फ्लूविषयी जागरूकता करू, माणसांमध्ये पसरू नये, अशी काळजी घेतली

# शिऊर बंगला ते नांदगाव रस्त्याच्या कामाचे पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते भुमिपूजन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

वैजापूर तालुक्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून भरघोस निधी देऊ व येथील जनतेची कामे करु असे आश्वास्न राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी आज तलवाडा ता. वैजापूर येथे केले.तलवाडा येथे शिऊर बंगला ते नांदगाव यामार्गाच्या भूमिपुजन कार्यक्रमात ते बोलत होते.

तलवाडा येथे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते शिऊर बंगला ते नांदगाव मार्गाचे सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन आज करण्यात आले. आमदार प्रा. रमेश बोरनारे, कन्नडच्या आमदार संजना जाधव, माजी आमदार भाऊसाहेब चिकटगावकर, अभय चिकटगावकर, राजेंद्र जंजाळ आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. त्यानंतर पालकमंत्री शिरसाट यांचा नागरी सत्कार आयोजित करण्यात आला. संजय निकम, साबेर खान, राजीव डोंगरे, बाबासाहेब जगताप, ज्ञानेश्वर जगताप,भागीनाथ मगर, रामहरी जाधव, राजेंद्र मगर, नारायण कवडे, विशाल शेळके, संजय बोरनारे, कल्याण दंगोडे, रिखाब पाटणी, कचरू डिके, उत्तमराव निकम, एल एम पवार,गोरख आहेर, प्रशांत शिंदे, प्रभाकर जाधव, अंबादास खोसे, बाबासाहेब राऊत, किशोर मगर, अनिल भोसले, संतोष सूर्यवंशी, शांताराम मगर, राजेंद्र साळुंके, सुभाष आव्हाळे, राधाकृष्ण सोनवणे, प्रमोद मगर, भारत साळुंके, डॉ अर्जुन साळुंके, बाळासाहेब जाधव, यांच्यासह तलवाडा, शिऊर, लोणी खुर्द, वाकला आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अतिविशेषोपचार रुग्णालयाचे लोकार्पण

# अवयव प्रत्यारोपण सुविधेसह सर्व सुविधा उपलब्ध करणार- वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ







**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आणि संलग्न रुग्णालयात गोरगरीब रुग्ण मोठ्या संख्येने उपचारासाठी येतात. त्यांना उत्तम उपचार सुविधा देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालयात अवयव प्रत्यारोपण सुविधांसह सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील,असे आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी आज येथे दिले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील (घाटी रुग्णालय) सर्व सुविधांचा विकास करणे ही आमची जबाबदारी असून पालकमंत्री म्हणून सर्व कामांसाठी एकत्रित निधी देणार,अशी घोषणा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केली. येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आज अतिविशेषोपचार रुग्णालयाचे उद्घाटन व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय घटकांसाठी करावयाच्या सुविधांचे भुमिपूजन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ्फ यांच्या हस्ते व पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर बजाज शैक्षणिक संकुलात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र पदभार) आयुष, आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालय प्रतापराव जाधव हे दुरदृष्य प्रणालीने या कार्यक्रमात सहभागी होते. राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड, विधान परिषद सदस्य आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, संचालक डॉ. अजय चंदनवाले, अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, विशेष कार्य अधिकारी डॉ. वैशाली उणे आदी उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ म्हणाले की, वैद्यकीय शिक्षण विभागाचे काम रुग्णांना सेवा देतांनाच समाजासाठी चांगले डॉक्टर्स घडविणे हे सुद्धा आहे. त्यामुळे चांगली रुग्णसेवा देतांनाच दर्जेदार शिक्षण देण्याचे काम या विभागामार्फत होत असते. मेरीट मध्ये आलेले विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. त्यांना शिक्षणाची, रहिवासाची चांगली सुविधा उपलब्ध करण्यात येते. याशिवाय येणारे गोरगरीब रुग्णांना दर्जेदार सेवा देणे हे सुद्धा आमचे कर्तव्य आहे. संलग्नित खाजगी व धर्मादाय रुग्णालयात योजनांद्वारे आर्थिक मदत देऊन उपचार दिले जातात. असे असले तरी रुग्णांना दर्जेदार सेवा देण्यासाठी शासकीय रुग्णालये बळकट करण्याचे आमचे धोरण आहे. येत्या वर्षभरात शासकीय रुग्णालयांमध्ये अवयव प्रत्यारोपणासारख्या उपचार सुविधांसोबत सर्व सेवा देण्यात येतील, असे नियोजन आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक गोरगरीब रुग्णाला चांगली सेवा द्या. गोरगरिबांची सेवा हीच परमेश्वराची सेवा आहे, असे मुश्रीफ यांनी सांगितले.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर्सच्या सुविधांकडे अधिक लक्ष पुरविण्यात येईल. या शहराचे वैभव आणि ओळख असलेल्या या रुग्णालयात सुविधा देण्याची जबाबदारीही पालकमंत्री म्हणून आपली आहे. तेव्हा अधिकाधिक दर्जेदार सुविधा देण्यासाठी एकत्रित निधी देण्याचा प्रयत्न करु.

रुग्णालयात आणि महाविद्यालयात लोकप्रतिनिधी, रुग्ण, समाजसेवक अशा सगळ्यांशी सुसंवाद व्हावा व त्यासाठीही प्रयत्न व्हावेत,असे निर्देशही त्यांनी दिले. खा. डॉ. भागवत कराड व वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांनीही आपेल मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. अर्चना दरे यांनी तर डॉ.वैशाली उणे यांनी आभार मानले.

# सौरऊर्जेवर चालणारी देशातील पहिली कार लॉन्च

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो २०२५ कार्यक्रमात, पुणे येथील इलेक्ट्रिक वाहन स्टार्ट-अप कंपनी वायवे मोबिलिटीने देशातील पहिली सौरऊर्जेवर चालणारी कार "Vayve Eva' लॉंच केली आहे. ही कार ३ मीटर लहान असून तिची सुरुवातीची किंमत ३.२५ लाख रुपये आहे. ही कार एकदा चार्ज केल्यावर २५० किमी पर्यंतची रेंज देईल.

Vayve Eva कारमध्ये सोलर पॅनल देण्यात आले आहे. ज्याचा वापर कारच्या सनरूफच्या जागी केला जाऊ शकतो. या कारच्या १ किलोमीटर चालवण्याची किंमत फक्त ८० पैसे आहे. यासोबतच ही देशातील पहिली सौरऊर्जेवर चालणारी इलेक्ट्रिक कार असल्याचा दावा कंपनीने केला आहे. त्याचबरोबर कंपनीचा दावा आहे की, ही कार एका चार्जवर २५० किमीपर्यंत धावू शकते. Vayve Eva तीन व्हेरिएंटमध्ये Nova, Stella आणि तशसर मध्ये लॉंच करण्यात आली आहे.ही कार ३ मीटर लहान आहे. यातील पहिल्या व्हेरियंटची किंमत ३.२५ लाख रुपये, Stellaची किंमत ३.९९ लाख रुपये आणि तशसर व्हेरिएंटची किंमत ४.४९ लाख रुपये आहे. या कारमध्ये ॲपल-अँड्रॉइड सिस्टम उपलब्ध असेल. यामध्ये एसीसह ॲपल कारप्ले आणि अँड्रॉइड ऑटो कनेक्टिव्हिटी सिस्टम आहे. त्याची लांबी ३०६० मिमी, रुंदी ११५० मिमी, उंची १५९० मिमी आणि ग्राउंड क्लीयरन्स १७० मिमी आहे. या कारच्या पुढच्या बाजूला स्वतंत्र कॉइल स्प्रिंग सस्पेंशन आणि मागील बाजूला ड्युअल शॉक सस्पेंशन आहे. यात पुढच्या चाकांमध्ये डिस्क ब्रेक आणि मागच्या चाकांमध्ये ड्रम ब्रेक आहेत. इलेक्ट्रिक पॉवर स्टेअरिंगने सुसज्ज असलेल्या या कारचा टर्निंग रेडियस ३.९ मीटर आहे. या रियर व्हील ड्राइव्ह कारचा टॉप स्पीड ७० किमी/तास आहे.ही सोलार कार फक्त ५ सेकंदात ० ते ४० किलोमीटर प्रति तासाचा वेग गाठू शकते. त्याच वेळी, ही पूर्ण चार्ज होण्यासाठी फक्त ४५ मिनिटे लागतील. त्यामुळे आता या कारला ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळणार का याकडे पाहणं उत्सुकतेचे ठरणार आहे.

# पीएम किसान योजनेच्या नियमात होणार बदल!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पीएम किसान योजनेत पारदर्शकता यायला हवी. तसेच खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्याला या योजनेचा फायदा घेता यावा. यासाठी केंद्र सरकारने या योजनेच्या नियमात बदल केला असेल असं मला वाटतं, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. त्यामुळं आता केंद्र सरकारनं नेमका पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेत कोणता बदल केला असेल? अशी चर्चा सर्वत्र सुरु आहे.

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. ही मदत ४ महिन्याला २००० रुपयांचा हप्ता या प्रमाणे दिली जाते. आत्तापर्यंत शेतकऱ्यांना जीएम किसान योजनेचे १८ हप्ते मिळाले आहेत. १९ वा हप्ता कधी मिळणार अशी देखील मोठ्या प्रमाणात चर्चा सुरु आहे. लवकरच म्हणजे पुढच्या फेब्रुवारी महिन्यात पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता मिळणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत कोणताही माहिती मिळाली नाही. मात्र, अशातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्वाचं वक्तव्य केलं आहे. केंद्र सरकारने या योजनेच्या नियमात बदल केला असेल असं मला वाटतं असे एकनाथ शिंदे म्हणाले.

राज्यात जिथे जिथे विकासाची आवशकता आहे तिथे तिथे आम्ही विकास करु या विशस्वासाने लोक येत आहेत असे शिंदे म्हणाले. आजचं स्वामीत्व योजना जाहीर केली आहे. सर्वसामान्य लोकांना न्याय देण्याचं काम मोदी करत आहेत. आज ६५ लाख लोकांना लाभ मिळाला असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. पीएम किसान योजनेत पारदर्शकता यायला हवी, खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्याला या योजनेचा फायदा घेता यावा, प्रत्येक शेतकऱ्याला या योजनेचा फ़्फ़ायदा घेता यावा यासाठी केंद्राने नियमात बदल केला असेल असं मला वाटत असेही शिंदे म्हणाले. विचारांशी तडजोड आणि बाळासाहेबांचे विचार सोडल्याने उबाठाची लोक येत आहेत. जिथे जिथे स्थानिक स्वराज्य संस्थांनाच्या निवडणुका आहेत

# लोककला महोत्सवात देशातील विविध कलांचे दर्शन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**





देशातील पारंपरिक लोककला जिवंत ठेवण्याचे काम देशातील विविध क्षेत्रात आजही कार्य करणाऱ्या लोक कलाकार करीत आलेले आहेत. शाहिरी, जागरण गोंधळ, वासुदेव-भारुड, लोकनाट्य, भीमगित, लोकगीत, अशा कितीतरी कला आजही केवळ कलाकारांच्या जागरूकते मुळे जिवंत आहेत .या कलेच्या उपासकांना शासनाने मानधन तर द्यावेच परंतु वयाच्या साठी नंतर त्यांना पेंशनही सुरु करावी अशी मागणी या लोककला महोत्सवाचे उदघाटन प्रख्यात समीक्षक ,विचारवंत व लेखक डॉ. ऋषीकेश कांबळे यांनी रविवार(ता,१९)रोजी कै, पुंजाजी बाबा प्रतिष्ठाण व लोककला विकास मंच आयोजित'लोककला महोत्सव -२०२५' निमित्त आयोजित कार्यक्रमात केली तरच हा मेळावा यशस्वी झाल्याचे समाधान जाईल असेही कांबळे पुढे म्हणाले,जेष्ठ पत्रकार स.सो.खंडाळकर यांनी ही भारतीय लोककला जपणाऱ्या या कलाकारांच्या मानधनसाठी

त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुंजाजी बाबा प्रतिष्ठाण चे अध्यक्ष व आयोजक एकनाथराव पुंजाजी त्रिभुवन यांनी केले. नवजीवन कॉलोनी हडको येथे जिल्ह्यातील व राज्यातील कलाकारांनी आपली कला सादर केली. आरंभी हे सर्व कलाकार विविध वेशभूषा धारण करून, टी. व्ही. सेंटर चौक येथे एकत्र आले व तेथून वाजत गाजत आपली कला रस्त्याने सादर करीत राष्ट्रवादी भवन येथे पोहचले.प्रति संत गाडगेबाबा च्या वेषात असलेले वैजापूरचे ठा. धोंडीरामसिंह राजपूत यांनी स्वच्छतेचा संदेश देत संभाजीनगरच्या नागरिकांत स्वच्छता जागृती केली. कार्यक्रम स्थळी खंडाळा येथील शाहीर अशोक बागुल यांनी गोपाला-गोपाला देवकीनंदन गोपाला हे संत गाडगेबाबा यांचे भजन गायिले व धोंडीराम राजपूत यांनी एक महिला पाया पडायला आल्यावर तिला पाया न पडू देता, हातात खराटा देऊन स्वच्छतेचा पाठ गिरवायला लावला. शिक्षणाचे महत्व सांगून कोंबड,बकरू यांचा बळी न देण्याचा उपदेश केला. दारूसोडा, बिडी, सिगारेट सोडा हा उपदेश ही केला.व अंधश्रद्धा सोडा, मुलां-बाळांना उच्च शिक्षण द्या असेही आवाहन केले. चार्ली चॅप्लिनच्या भूमिकेत सोमनाथ स्वभावाणे(चार्ली)यांनी आपल्या मूक अभिनयातून आपली कला सादर केली.

कलाकारांनी आपली विविध कला, भारुड, शाहिरी, भीमगित सादर केली.या सर्व कलाकारांना स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. आयोजक एकनाथराव पुंजाजी त्रिभुवन यांनी सर्वांचे आभार मानले. शाहीर अशोक बागुल, संगीता धनेधर, मीना साळवे, प्रवीण केदार, शांतीलाल पवार, श्रीमती राऊत, श्रीमती शिंदे, व्ही.व्ही. खिल्लारे, ग. ह. राठोड, माधव बोर्डे, पत्रकार संघाचे किरणसिंह राजपूत, वैजापूर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# आधार फेस ऑथेंटिकेशन व्यवहार १०० कोटींच्या टप्प्यावर; पाच महिन्यांत दुप्पट वाढ





**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

'आधार'द्वारे सेवा वितरण अधिक सक्षम करण्यासाठी णखऊअख (युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया) आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आधार संवाद या कार्यक्रमाला इक्रडख, फिनटेक आणि टेलिकॉम क्षेत्रातील ५०० हितधारक उपस्थित होते. या कार्यक्रमात आधारच्या विविध उपयोजनांवर चर्चा करण्यात आली.

फेस ऑथेंटिकेशन व्यवहारांचा ऐतिहासिक उच्चांक

आधार फेस ऑथेंटिकेशन व्यवहारांनी १०० कोटींचा टप्पा ओलांडला, केवळ पाच महिन्यांत ५० कोटींवरून दुप्पट वाढ झाली. २०२१ मध्ये सुरू झालेली ही अख/चङ आधारित प्रणाली विविध क्षेत्रांमध्ये सुरक्षित आणि सुलभ ओळख पडताळणीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहे.

हितधारकांचा सहभाग : बँकिंग, एनबीएफसी, फिनटेक आणि टेलिकॉम क्षेत्रांतील तज्ज्ञांनी आधारच्या वापरासाठी चार पॅनल चर्चासत्रांमध्ये भाग घेतला. या सत्रांमध्ये आधारच्या माध्यमातून सेवा सुधारण्यासाठी उपाययोजना व धोरणांवर विचारमंथन करण्यात आले.

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमधील आधारची भूमिका : इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांनी आधारच्या लोकसंख्याशास्त्रीय वापराबद्दल सांगताना 'आधार'ने डिजिटल व्यवहारांवरील विश्वास वाढविण्यासाठी दिलेले योगदान अधोरेखित केले.

फेस ऑथेंटिकेशनचा वापर: आधार फेस ऑथेंटिकेशन प्रणालीला सध्या ९२ सरकारी आणि खासगी संस्था वापरत आहेत. ही प्रणाली सुरक्षित, संपर्कविहीन आणि कुठेही, कधीही वापरण्यास सोयीस्कर आहे.

UIDAI चे सीईओ भुवनेश कुमार यांनी आधारद्वारे सेवा वितरण अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने णखऊअख च्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या कार्यक्रमाने वित्त, दूरसंचार, फिनटेक आणि सार्वजनिक सेवांमध्ये आधारच्या वापराचा विस्तार करण्याचा उद्देश ठेवला आहे.

आधार संवाद कार्यक्रमाचा दुसरा टप्पा मुंबईत यशस्वीरित्या पार पडला. पहिला टप्पा नोव्हेंबरमध्ये बेंगळुरूमध्ये आयोजित करण्यात आला होता.

# रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर पार पडणारा हा पहिला कुंभमेळा उन्नतीचे नवे प्रवाह आणेल

चीन परंपरा आणि आधुनिकता यांचा उत्तम संगम यंदाच्या महाकुंभात दिसणार आहे. त्यामुळेच २०२५ च्या महाकुंभ सोहळ्याकडे केवळ संत-महंत आणि ऋषीमुनींचेच लक्ष लागले नसून भारतासारखा विविधतेत एकता जपणारा देश या पवित्र संगामावर पार पडणारे आध्यात्मिक संघटन, संमेलन कसे हाताळतो याकडे जगाचे लक्ष आहे. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर पार पडणारा हा पहिला कुंभमेळा उन्नतीचे नवे प्रवाह आणेल.

नदीच्या काठाने जन्म घेतलेल्या मानवाने पुढे आपली संस्कृती आणि सभ्यताही प्रवाहाच्या साक्षीनेच वाहती ठेवली. काळागणती तिच्यात अनेक गोष्टींची भर पडत गेली. समाज बदलला. जगण्यात नवनवीन प्रवाह मिसळत गेले, तरीदेखील आजही पूर्वापार असणाऱ्या परंपरा जपल्या जातात. किंबहुना, नव्या झळाळीने, श्रद्धा आणि भक्तीपूर्वक त्यांचे पालन होताना दिसते. महाकुंभमेळा त्यातीलच एक. या पार्श्वभूमीवर १३ जानेवारी ते २६ फ्फेब्रुवारी दरम्यान आयोजित होणाऱ्या महाकुंभ मेळ्याकडे भारतवासियांचेच नव्हे, तर समस्त जगाचे लक्ष लागले आहे. या निमित्ताने प्रचंड मोठ्या संख्येने एकत्र येणारे साधू-महंत, आखाड्यांमधील पूजक आणि भाविकांना पाहणे, शाही स्नानाचा आनंद घेणे, त्यांच्या वेगळ्या आणि आध्यात्मिक जगाचा परिचय करून घेत अभ्यास करणे हा जगासाठी औत्सुक्याचा विषय ठरतो. त्यामुळेच महाकुंभाचे पर्व अनुभवण्यासाठी येणाऱ्या देशी-परदेशी लोकांची संख्या दरवर्षी वाढते. आताही भाविकांना, अभ्यासकांना सामावून घेण्यासाठी तीर्थराज प्रयाग सज्ज असून परंपरेचे पाईक असणारा इथला समाज उच्च तंत्रज्ञानाचा हात धरून कसा पुढे जातो, खऱ्या अर्थाने नव्या-जुन्याचा संगम कसा साधतो याचे चित्र यानिमित्ताने जगापुढे साकारणार आहे.

महाकुंभ हे अमृतपुरुष भारताचे अनोखे स्वरूप आहे. या उत्सवाची पार्श्वभूमी पाहता इतिहास-पुराणांची अनेक प्राचीन पाने आपल्यासमोर उलगडतात. देवासूर, कद्रू-विनता यांच्यातील युद्ध आणि भगवान धन्वंतरीने दिलेल्या अमृत-कुंभाची प्राप्ती यासंबंधी अनेक रंजक कथांचे अध्याय कुंभाच्या कथांमध्ये आहेत. खरे तर महाकुंभ ही व्यक्तीच्या एकुणच एकात्मतेच्या विलक्षण अनुभवाची प्रयोगशाळा आहे. गंगा-यमुना-सरस्वतीचा संगम असणाऱ्या तीर्थक्षेत्र प्रयागराजमध्ये दर बारा वर्षांनी हा महान उत्सव होतो. आपल्या धार्मिक-पौराणिक भूगोलाची पवित्र भूमी असण्याबरोबरच तो आपल्या आध्यात्मिक सांस्कृतिक काळ-चेतनेचा चिरंतन पुरावाही आहे. यामध्ये आपल्याला ऋषी परंपरेने प्रेरित असणारा भारत पाहण्याची, अनुभवण्याची संधी मिळते. कुंभमेळ्यामध्ये आपण अखंड परंपरा पाहतो. प्रख्यात आचार्य, जगद्गुरू, महामंडलेश्वर आणि सर्व परंपरांचे संत-महंत येथे जमतात. त्यामुळेच पौराणिक महानता, अध्यात्मिक अनुभव, ऐतिहासिक वैभव, सांस्कृतिक दिव्यता आणि भौगोलिक भव्यता या सगळ्याची जोड २०२५च्या महाकुंभाला मिळत आहे. हा योग भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतकाळात येत असल्याने अधिक महत्त्वपूर्ण आहे. अमृताचा लाभ घेण्याच्या संकल्पाशी समन्वित असणारा हा महाकुंभ उत्सव म्हणजे आपल्या राष्ट्रीय चेतनेला संपूर्णपणे भारत-पुरुष म्हणून ओळखण्याचा एक रत्नासारखा मेळ आहे. आपल्या महान राष्ट्राची अखंडता, सार्वभौमत्व, शौर्य आणि समृद्धी अधोरेखित करण्याची ही एक संधी आहे. अयोध्येच्या राम मंदिरात रामलल्लाची प्रतिष्ठापना झाल्यानंतरचा पहिला महाकुंभ असल्यामुळेही याला विशेष महत्त्व आहे. थोडक्यात, महाकुंभ हे आपल्या सांस्कृतिक अस्मितेचे जिवंत स्मारक आहे, असेही म्हणता येईल. त्रिवेणी नदीच्या काठावर महाकुंभ आयोजित केला जातो. त्याच ठिकाणी त्रेतामध्ये रामाने लोककल्याणासाठी वनयात्रेची सुरुवात केली होती. तिच्या काठावर, प्रेममूर्ती भरत यांनी पुरुषार्थ चतुष्ट्याचा त्याग केला आणि भक्तीची विनंती केली. त्यामुळेच प्रयाग हे आपल्या सांस्कृतिक अस्मितेचे चिरंतन स्थान आहे. या महाकुंभाकडे पाहताना आणखी काही परिमाणही लक्षात येतात. त्याचाच एक भाग म्हणून भारताच्या केंद्रीय नेतृत्वाचे स्पष्ट प्राधान्यक्रम आणि त्यातून निर्माण होणारे जागतिक परिमाण सेवा, सुरक्षा, शिक्षण, औषधोपचार आणि सुसंवादाने परिपूर्ण भारताचे दर्शन

पान ४ वर

# जागतिक बँकेसोबतच्या कराराआधारे कौशल्य विकासाच्या योजना प्रभावीपणे राबवणार - कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जागतिक बँकेसोबत झालेल्या २३००कोटी रूपयांच्या कराराच्या आधारे कौशल्य विकास विभागाच्या योजना प्रभावीपणे राबवणार आहोत. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमधून आगामी शंभर दिवसात ५० हजार युवांना प्रशिक्षण देणार असून मुंबईबरोबरच नागपूर,पुणे,नाशिक, अमरावतीसह छत्रपती संभाजीगर येथे महाराष्ट्र इंटरनॅशनल केंद्र कार्यरत करणार असल्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.




मंत्रालयात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शंभर दिवसांच्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत करत असलेल्या कार्यवाहीची मकौशल्य विकास मंत्री श्री.लोढा म्हणाले की, कौशल्य विकास विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभाग नोकरी देणाऱ्या संस्थाबाबत सर्वसमावेशक असा एकत्रित कायदा करणार असून, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत ५०० विविध अभ्यासक्रमांचे व्हिडीओज ऑनलाईन उपलब्ध होणार आहेत. त्याचप्रमाणे १००० शाळांमध्ये करिअर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत. जागतिक बँकेसोबत झालेल्या कराराआधारे आयटीआयची दर्जोन्नती करण्यात येणार आहे. राज्य नाविन्यता कौशल्य विकास सोसायटी मार्फत 'आयटीआय'च्या कौशल्य विकास केंद्रामार्फत १ लाख १० हजार युवकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.त्याचबरोबर आयटीआय तसेच व्यवसाय शिक्षण संचालनालयाच्या परीक्षा ऑनलाईन करण्यासाठी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. आगामी काळात १०० रोजगार मेळावे आयोजित केले जातील.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शंभर दिवसाच्या कृती आराखड्यात विभागाचे संकेतस्थळ अद्ययावत करणे, कार्यालयातील सोयी व सुविधा वाढवणे, सुकर जीवनमान, गुंतवणूक प्रसार, जनतेच्या तक्रारींचे निवारण, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या कृती कार्यक्रमावर भर देणार असून विभागाचा कारभार अधिक गतीमान करण्यात येणार आहे. १००० विविध सामंजस्य करार करण्यात आले आहे. कौशल्य विद्यापीठात मायक्रोसॉफ्टच्या सहाय्याने आर्टिफिशियल इंटिलिजेसचे १० हजार युवांना प्रशिक्षण देणार असल्याचेही श्री.लोढा यांनी यावेळी सांगितले.

# १५ फेब्रुवारी ला ग्रीन झोन वाळुज महानगर येथे संत सेवालाल महाराज जयंती निमित्त,पोहरा देवीचे महंत उपस्थित राहणार - जिल्हा अध्यक्ष,लहु भाऊ राठोड



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सेवालाल महाराज ग्रीन झोन मंडळ व जगदंबा देवी ग्रीन झोन मंडळ या ठिकाणी नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेची बैठक पार पडली या बैठकीमध्ये जयंती विषयक चर्चा करून जयंतीचे स्वरूप आखण्यात आले व पदाधिकारी यांना जयंतीच्या कार्यक्रमाची जबाबदारी देण्यात आली या बैठकीला आवर्जून नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेचे राष्ट्रीय व राज्य कार्यकारणी उपस्थित होते छत्रपती संभाजीनगर जिल्हा पदाधिकारी आणि वाळूज महानगर पदाधिकारी यांच्या नेतृत्वामध्ये जयंती पार पडणार आहे.

तसेच ह्या कार्यक्रमाला नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष किरण भाऊ चव्हाण राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मुकेश भाऊ राठोड छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार माननीय संदिपान भुमरे साहेब संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा समाज कल्याण मंत्री संजयजी शिरसाट साहेब राजू भैया राठोड शिवसेना जिल्हाप्रमुख रमेश भाऊ पवार कार्याध्यक्ष सचिन भाऊ राठोड व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री रमेश व महिला प्रदेश अध्यक्ष आशाताई राठोड भाऊ चव्हाण नगरसेवक बी.बी. चव्हाण साहेब व श्री विनोद भाऊ जाधव दिशा सेक्युरिटी त्याचबरोबर अनेक उद्योजक राजकीय सामाजिक शैक्षणिक कार्य करणारे समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार.

# जपानच्या पर्यटकांनी महाराष्ट्र राज्याला जरूर भेट द्यावी - पर्यटन मंत्री शंभूराज देसाई



**मुंबई** – जपानच्या पर्यटकांनी महाराष्ट्र राज्याला जरूर भेट द्यावी. पर्यटनातून दोन्ही प्रांतातील परस्पर संबंध अधिक वृध्दिंगत होतील, असे मत पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी व्यक्त केले.

जपानच्या वाकायामा प्रांताच्या शिष्टमंडळाने पावनगड येथे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांची भेट घेतली. यावेळी पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, जपानचे वाकायामा प्रांताचे आंतरराष्ट्रीय घडामोडीचे संचालक योशीओ यामास्ताचे, जपानचे मुंबईतील महावाणिज्यदूत यागी कोजी, वाकायामाचे सोनोबे सॅन, महिरा हेदुयेकी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी, महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, अधिक्षक अभियंता शैलेंद्र बोरसे, यावेळी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित शिष्टमंडळाने पर्यटनवाढीच्या दृष्टीने देण्यात येत असलेल्या सवलती व योजनांची माहिती महाराष्ट्राच्या पर्यटन विभागाकडून जाणून घेतली. एप्रिल महिन्यात महाबळेश्वर येथे होणाऱ्या पर्यटन महोत्सवास जरुर यावे, असे आग्रहाचे निमंत्रणही पर्यटनमंत्री श्री.देसाई यांनी दिले.

# १४ हजार लाभार्थ्यांना १२५ लक्ष रुपयांचा लाभ

## डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत अनुदान

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत सन २०२४-२५या आर्थिक वर्षामध्ये १४ हजार ४०२ लाभार्थ्यांना एकूण रक्कम १२५ लक्ष रुपयांचा लाभ देण्यात आला आहे,अशी माहिती जिल्हा उपनिबंधक डॉ. मुकेश बारहाते यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीककर्जाची विहीत मुदतीत पूर्णत: परतफ्केड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना ही पीक उत्पादन प्रोत्साहान योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत तीन लक्ष रुपयांपर्यंतचे अल्पमुदतीच्या पीक कर्जाची विहीत मुदतीत परतफ्केड करणाऱ्या शेतकऱ्यांना ३% व्याज सवलत लागू करण्यात आली आहे. निकषानुसार घेतलेल्या पीक कर्जाची विहीत मुदतीत मुद्दल व व्याजासह पूर्णत: परतफ्केड करणारे शेतकरी या योजनेस पात्र ठरतात.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये १४ हजार ४०२ लाभार्थ्यांना एकूण रक्कम १२५ लक्ष रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. तरी शेतकऱ्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजने संबधी अधिक माहितीसाठी आपल्या बँक शाखेशी तसेच आपले तालुक्यातील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ.मुकेश बाराहाते यांनी केले आहे.

# दहावीच्या विद्यार्थ्याने गिरवले प्रशासकीय कामकाजाचे धडे; जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून 'डे विथ कलेक्टर' उपक्रम

**प्रसादच्या जिज्ञासू वृत्तीचे व या उपक्रमाचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले कौतुक**

**कोल्हापूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हातकणंगले तालुक्यातील पारगाव येथील श्री पाराशर हायस्कूल या शाळेतील इयत्ता दहावी चा विद्यार्थी प्रसाद संजय जाधव याने आज ङ्कडे विथ कलेक्टरङ्क उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या सोबत प्रशासकीय कामकाजाचे धडे गिरवले:. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठकांमध्ये प्रसादने उपस्थित राहून कामकाजाची माहिती घेतल्याचे पाहून वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी त्याच्या जिज्ञासू वृत्तीचे व या उपक्रमाचे कौतुक केले.

वयाच्या मानाने प्रसादची उंची सर्वसामान्य मुलांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. याचा उपचार भारतामध्ये होत नसून परदेशात होत असल्याची माहिती त्याच्या शिक्षिका स्वाती कोकीतकर यांनी दिली. यावर वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी प्रसादच्या उंची वरील उपचारासाठी त्याला परदेशात पाठविण्याबाबत सहकार्य करण्यात येईल,असे सांगितले.

शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी, अभ्यासाची सवय लागावी. तसेच स्पर्धा परीक्षांची ओळख व्हावी आणि 'जिल्हाधिकारी' यांच्या करिअर व कार्याची माहिती घेवून यातून त्यांना प्रेरणा मिळावी.

तसेच त्यांना योग्य मार्गदर्शन आणि दिशा देण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून ङ्कडे विथ कलेक्टरङ्क हा नाविन्यपूर्ण उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत निवड केलेल्या एका विद्यार्थ्यासोबत दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत जिल्हाधिकारी संवाद साधणार आहेत. उत्सुक, प्रज्ञावंत आणि विशेष मुलांना जिल्हाधिकाऱ्यांसोबत संवाद साधण्याची संधी या उपक्रमाने मिळणार आहे.

या उपक्रमाची पहिली संधी मिळालेला प्रसाद जाधव हा दरवर्षी वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होतो. प्रसादने मागील ३ वर्षामध्ये भरवण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच त्याने वक्तृत्व स्पर्धेत अनेक बक्षिसे मिळवली आहेत. सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्व असणाऱ्या प्रसादला भावी जीवनात जिल्हाधिकारी होण्याचे स्वप्न आहे. आजच्या ङ्कडे विथ कलेक्टरङ्क उपक्रमात त्याने आज सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याशी संवाद साधत त्यांच्या कामकाजाची सविस्तर माहिती जाणून घेतली. शाळेचे मुख्याध्यापक नंदकुमार यादव, पर्यवेक्षिका सुरेखा रोकडे, आई-नम्रता व वडील संजय जाधव यांचे मार्गदर्शन त्याला मिळाले आहे.

तसेच विज्ञान शिक्षिका स्वाती विनायक कोकीतकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने तिन्ही वर्षी विज्ञान उपकरणे तयार करुन ती प्रदर्शनात सादर केली होती. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून 'डे विथ कलेक्टर' या उपक्रमाबरोबरच जिल्ह्यातील शालेय स्तरावरील शिक्षकांसाठी 'कॉफी विथ कलेक्टर' हा अभिनव उपक्रमही राबविण्यात येणार आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी दुपारी २ ते ३ या वेळेत होणाऱ्या या उपक्रमात निवड केलेल्या शाळेतील शिक्षकांसोबत जिल्हाधिकारी श्री. येडगे संवाद साधणार आहेत.

पान ३ वरून

# रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर पार पडणारा हा पहिला कुंभमेळा उन्नतीचे नवे प्रवाह आणेल

घडवत आहेत. अयोध्या, मथुरा, काशी, हरिद्वार, केदारनाथ, विंध्याचल यासह भारतातील दिव्य तीर्थक्षेत्रे त्यांच्या आध्यात्मिक वैभवात पुनर्संचयित केली जात आहेत. त्यामुळे महाकुंभ एकात्मिक दृष्टी, समन्वित प्रयत्न आणि पूर्ण सहकार्याचा पुरावा ठरेल.

यंदाचा महाकुंभ धार्मिक दृष्टीनेच नाही, तर आर्थिक उलाढालीचेही मोठे केंद्र आहे. त्यामुळेच तब्बल ५६ दिवस चालणारा हा कार्यक्रम केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर आर्थिक आणि व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातूनही एक अद्वितीय उदाहरण असल्याचे जाणून घ्यावे लागेल. महाकुंभच्या आयोजनासाठी राज्य सरकारने पाच हजार ४३५ कोटी ६८ लाख रुपयांचे मोठे बजेट ठेवले आहे. २०१९ मध्ये झालेल्या कुंभमेळ्याच्या ४,२०० कोटी रुपयांच्या बजेटपेक्षा हे खूप जास्त आहे. या कार्यक्रमासाठी सुमारे ७,५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या रकमेत केंद्र सरकारच्या योगदानाचाही समावेश आहे. या वेळी केंद्राने २,१०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महाकुंभ कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ४२१ प्रकल्पांवर काम सुरू आहे. त्यापैकी ३,४६१.९९ कोटी रुपयांच्या योजनांना आधीच मान्यता देण्यात आली. यामध्ये पायाभूत सुविधांचा विकास, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेपासून भाविकांसाठी सुविधांच्या व्यवस्थापनापर्यंत प्रत्येक बाबींचा समावेश आहे. एकूणच महाकुंभाचे बजेट वाढले आहे. १८८२ मध्ये महाकुंभावर केवळ २० हजार २८८ रुपये खर्च झाले होते. त्या वेळी मौनी अमावस्येला सुमारे आठ लाख लोकांनी महाकुंभात स्नान केले होते. तेव्हा भारताची एकूण लोकसंख्या २२.५ कोटी होती. १८९४च्या कुंभमेळ्यावेळी भारताची लोकसंख्या २३ कोटी झाली आणि सुमारे दहा लाख भाविकांनी कुंभात स्नान केले. या कार्यक्रमासाठी ६९,४२७ रुपये खर्च करण्यात आले होते. १९१८ च्या महाकुंभात संगमावर स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या ३० लाखांवर गेली. त्याचे बजेट १.३७ लाख रुपये होते. काळानुरूप केवळ भाविकांचीच संख्या वाढली नाही, तर कार्यक्रमाचे बजेट आणि व्यवस्थेची पातळीही वाढल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. अर्थातच हा सरकारी खर्च झाला. त्यापेक्षा सुमारे वीसपट जास्त उलाढाल होत असते, हेदेखील विचारात घ्यायला हवे. आता या धार्मिक-आध्यात्मिक सोहळ्याला प्रगत तंत्रज्ञानाची साथ मिळाली आहे. भाविकांसाठी उत्तम स्वच्छता, सुरक्षित स्नान घाट, राहण्याची तात्पुरती व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, वाहतूक व्यवस्था या सगळ्यामध्ये त्याचे दर्शन घडते. महाकुंभाला येणाऱ्या कोट्यवधी भाविकांसाठी संगमाजवळ आधुनिक सुविधांनी सुसज्ज टेंट सिटी उभारण्यात आली आहे. वीज, पाणी आणि स्वच्छता या सगळ्यासाठीच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. शिवाय ड्रोन आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून मेळ्यावर लक्ष ठेवले जात आहे. महाकुंभ हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून प्रादेशिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मोठी चालना देतो. या कार्यक्रमामुळे पर्यटन, वाहतूक, खाद्य आणि पेय व्यवसाय, हॉटेल्स, लॉजिंग आणि स्थानिक हस्तकला उद्योगांना प्रचंड फ्कायदा होतो. महाकुंभ २०२५ दरम्यान छोटे-मोठे दुकानदार, टॅक्सी आणि रिक्षाचालक, मार्गदर्शक, स्थानिक कारागीर यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होणार आहे. अर्थात एवढा प्रचंड समुदाय एकत्र येत असल्यामुळे काही आव्हानेही उभी ठाकली आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर गर्दीचे व्यवस्थापन करणे, संसर्गजन्य आजाराची भीती वाढत असताना सार्वजनिक स्वच्छता राखणे, वीज आणि पाणी पुरवठा सुनिश्चित करणे, भाविकांची सुरक्षा हे विषय प्राधान्याने समोर येणारे आहेत.

नियोजनासाठी प्रशासनाने शेकडो पथके तयार केली आहेत. कुंभकाळात आरोग्यसेवाही मोठ्या प्रमाणात बळकट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत करता येईल. महाकुंभमध्ये उपचारांसाठी सहा हजार खाटा, १२५ रुग्णवाहिका आणि अशाच हाय-टेक आरोग्य सुविधा तयार आहेत. शेवटी महाकुंभ केवळ आर्थिक आणि प्रशासकीय दृष्टिकोनातूनच महत्त्वाचा नाही, तर त्यात भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरांचेही प्रतिबिंब आहे. हा भारताची प्राचीन संस्कृती आणि आधुनिकतेचा संगम असणारा उत्सव आहे. भारत आपला सांस्कृतिक वारसा कसा जिवंत ठेवतो आणि आधुनिकतेची जोड देऊन नव्या रूपात कशी सादर करतो, याचे जगाला औत्सुक्य आहे. महाकुंभ केवळ भाविकांनाच नाही, तर जगाला संदेश देणारा आहे. त्यामुळे तो उत्तम प्रकारे पार पाडण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयाने ओळखायला हवी.

**-मधुरा कुलकर्णी**

# दिल्ली विमानतळावरील विमानसेवा २६ पर्यंत बंद

**नवी दिल्ली** – भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली विमानतळावरील विमानसेवा पूर्णपणे बंद करण्यात आल्याचे वृत्त आहे. दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील विमान वाहतूक तात्पुरती प्रतिबंधित करण्यात येत असल्याचे विमान प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने शनिवारी जाहीर केले आहे की, १९ जानेवारी २०२५ पासून २६ जानेवारीपर्यंत येथील विमानतळावर कोणतेही विमान उतरणार नाही किंवा उड्डाण करणार नाही. प्रजासत्ताक दिनाच्या उत्सवासाठी सुरक्षा खबरदारीमुळे वेळापत्रकात बदल करणे आवश्यक असले तरी, त्याचा विशिष्ट वेळेत आगमन आणि निर्गमनांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील सर्वात व्यस्त विमानतळ आहे, जे दररोज सुमारे १,३०० हून अधिक विमाने उड्डाण करतात.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

•**Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** •Email : **attalsanket2023@gmail.com** •RNI No. MAHMAR/2023/87816